**महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग, दुसरा मजला,

४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ Website - www.msbve.gov.in Email : chairman-msbve@ nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/परीक्षाकालावधीबदल/२०१७/ १०६४ दिनांक :- १४ /१२/२०१७

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, (सर्व)

विषय - एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा एप्रिल ऐवजी जुलै मध्ये आयोजित करणेबाबत

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-१२/१७४२/२०१७, दिनांक ०८/१२/२०१७

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या ६ महिने कालावधी अभ्याक्रमांची परीक्षा जानेवारी आणि जुलै मध्ये घेण्यात येतात. तसेच ०१ व ०२ वर्ष कालावधी अभ्यासक्रमांच्या परीक्षा एप्रिल मध्ये घेण्यात येतात.

सदर बाबत मंडळाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, ०१ वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया शालांत परीक्षेचा निकाल लागल्यानंतर साधारणतः जूनच्या तिसऱ्या आठवडयात सुरू होते व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर १/२ आठवडयापर्यंत म्हणजेच साधारणतः सप्टेंबर अखेरपर्यंत सुरू राहते. त्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरूवात होते आणि सदर प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा एप्रिलमध्ये घेण्यात येते. सदर कालावधी लक्षात घेता अशाप्रकारे अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणास प्रत्यक्ष एकूण कालावधी सप्टेंबर ते एप्रिल इतकाच मिळतो. त्यामुळे इतक्या कमी कालावधीत वार्षिक अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि प्रशिक्षणार्थ्यांना परीपूर्ण प्रशिक्षण देणे संस्थांना शक्य होत नसल्याचे मंडळाच्या निदर्शनास आलेले आहे. सदर बाब लक्षात घेता मंडळाने एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांच्या परीक्षेचा कालावधी बदलण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

**यापुढे एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा माहे जुलै मध्ये आणि दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा माहे एप्रिलमध्ये घेण्यात येईल.**

**सत्र १ जुलै २०१७ मध्ये एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची परीक्षा एप्रिल २०१८ ऐवजी जुलै २०१८ मध्ये घेण्यात येईल.** एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा जुलै २०१८ मध्ये घेण्यात येणार असल्याने सदर अभ्यासक्रमांचा प्रशिक्षण कालावधी ३० जून २०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे. सर्व संबधित संस्थांनी ३० जून २०१८ पर्यंत एक वर्ष कालावधी अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण पूर्ण करावयाचे आहे.

**एप्रिल २०१८ मध्ये केवळ दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांची परीक्षा घेण्यात येईल. तसेच सहामाही अभ्यासक्रमांची परीक्षा नेहमीप्रमाणे जानेवारी आणि जुलैमध्ये घेण्यात येईल.**

तरी वरीलप्रमाणे करण्यात आलेले बदल आपल्या स्तरावरून सर्व संबधित संस्थांना लेखी कळविण्यात यावे.

(डी.ए. दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

D: Desk-4 April 2018/ LETTERS

प्रत :-

१) मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई - ०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी सादर.
३) सहा. सचिव/लेखाअधिकारी/अधिक्षक यांना माहितीसाठी.
४) मंडळ कार्यालयातील सर्व कार्यासने - यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
५) निवड नस्ती.